पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

दिनांक - ०३**/०८/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०३/०८/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**

२. मा.पवार मनिषा प्रमोद

३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे

४. मा.कदम निकिता अर्जुन

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.मोरे ,मा.पाटील, मा.खाबडे – कार्यकारी अभियंता, मा.आगळे – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत होणा-या विविध सांस्कृतिक व क्रिडा विषयक कामाबाबत – मा.उषा ढोरे , मा. मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) महापालिकेतील मा.पदाधिकारी/अधिकारी यांचे खाजगी वाहन वापर खर्च अनुज्ञेय धोरणातील अट क्र.२ मधील बदलांबाबत – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) अतिक्रमण कारवाईसाठी मशीनरी वापराबाबत – मा.उषा ढोरे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.१८ मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणेच्या कामास कामाची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.उषा ढोरे , मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव

-----------

दिनांक २०/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०३/०८/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – “ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)” अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - २६ | विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०३/०८/२०१८ | विभाग – प्रशासन

सुचक : मा.उषा ढोरे | अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८,
दिनांक -३१/०३/२०१८

विषय – "स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २७ | विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०३/०८/२०१८ | विभाग – अ क्षेत्रीय स्थापत्य

सुचक : मा.उषा ढोरे | अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/६४६/२०१८ दि.०२/०६/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध सांस्कृतिक क्रिडा विषयक कामाबाबत मनपा मार्फत मंडप विषयक कामे करणेत येतात. सद्य परिस्थितीत निविदा नोटीस क्र.१३/०३/२०१७-१८ अंतर्गत कामाचे आदेश आले असुन सदरील काम रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार होते परंतु प्रा.रामकृष्ण सभागृह येथे सद्यस्थितीत नुतनीकरणाची कामे सुरु असले कारणाने सदर ठिकाणी मंडप व्यवस्थेच्या कामाची आवश्यकता भासणार नाही. सदरील कामातुन अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत होणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम उदा.पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला व सांस्कृतिक महोत्सव जगदगुरु संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज पालखी सोहळा तसचे इतर स्पर्धा व कार्यक्रम यासाठी लागणारे मंडप विषयक कामे सदरील नि.नो.क्र.१३/०३/२०१७-१८ यातुन करणे शक्य होईल. तरी रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे (नि.क्र.१३/०३/२०१७-१८) हया कामातुन क्षेत्रीय कार्यक्रमा अंतर्गत होणाऱ्या विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेचा जागा बदलीचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ | विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०३/०८/२०१८ | विभाग – प्रशासन

सुचक : मा.उषा ढोरे | अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/८७६/२०१८ दि.०२/०८/२०१८

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

पिंपरी चिंचवड महापालिकेतील मा.पदाधिकारी/अधिकारी यांनी महापालिकेच्या वाहनाऐवजी स्वत:चे खाजगी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरल्यास त्यापोटी खाजगी

वाहन वापर खर्च अनुज्ञेय करण्याची योजना महापालिकेच्या दृष्टीने आर्थिक हिताचे असल्याने प्रशासन विभागाकडील विषय पत्र क्र.प्रशा/११/कावि/८७०/२०१७, दि.०६/१०/२०१७ अन्वये मा. विधी समिती ठराव क्र. ३७, दि.०६/१०/२०१७ व मा. महापालिका सभा ठराव क्र. ८९, दि.१६/१०/२०१७ अन्वये महापालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांचेकरिता वाहन वाटप धोरणानुसार वर्ग १ व वर्ग २ च्या वाहन देय अधिका-यांना व पदाधिका-यांना मनपाचे वाहना ऐवजी स्वत:चे खाजगी चारचाकी वाहन ऐच्छिक पध्दतीने शासकीय कामकाजासाठी वापरण्यास व त्यासाठी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे प्रतिपूर्तीची रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे व सदर धारेणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. धोरण आदेश क्र. प्रशा/११/कावि/१०५०/२०१७, दिनांक ०४/१२/२०१७ मधील अटी व शर्तीतील अनु.क्र. २ नुसार मनपा कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा. पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वत:च्या अथवा कुटुंबातील (पती / पत्नी / अविवाहीत मुलगा/अविवाहीत मुलगी/आई/वडील) या सदस्यांचे नांवावर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. परंतू सदर अटी मध्ये मनपा कामकाजासाठी वापरण्यात येणारे खाजगी वाहन हे मा.पदाधिकारी/अधिकारी यांच्या स्वत:च्या अथवा कुटुंबातील (पती/पत्नी /मुलगा /मुलगी/आई/ वडील) या सदस्यांचे नांवावर नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. असा बदल करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करण्यात येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिकासभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक – ०५
दिनांक – ०३/०८/२०१८ विभाग – बांधकाम परवानगी
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.निकिता कदम
संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.बीपी/०५/कावि/२५३/२०१८ दि.०२/०८/२०१८

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ता/फुटपाथ , मनपाच्या सार्वजनिक मोकळया जागेवरील अतिक्रमण काढणेकामी अ, ब, क, ड, ई, फ, ग व ह या क्षेत्रीय कार्यालयातील अतिक्रमण विभाग निरस्त करुन मा.आयुक्तसो यांचेकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/१९२/२०१८ दि.२४/५/२०१८ अन्वये बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमण नियंत्रण व निर्मूलन विभाग स्थापन करणेत आले आहे. सदर अतिक्रमण विभागाचे वतीने अनाधिकृत /विनापरवाना हातगाडया/टप-यांवर एकत्रीत कारवाई मोहीम राबविण्यात येते. सदर कारवाई करणेकामी यंत्रसामुग्री आवश्यक आहे. बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील निविदा या प्रभागानुसार व उपअभियंता यांचे कार्यक्षेत्रानुसार काढलेल्या आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष अतिक्रमण कारवाई वेळी त्या त्या उपअभियंत्या कडून मशीनरी उपलब्ध करुन घ्यावी लागते. अतिक्रमण कारवाईचे ठिकाणी ऐनवेळी ठरविणेत येत असलेने व अशी मशीनरी वेळेवर पुरविणारे ठेकेदार वेगवेगळे असल्याने मशीनरी वेळेवर पुरविणेत अडचणी येत आहेत. बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडे अशा १२ निविदांची कामे सुरु आहेत. त्यापैकी दोन निविदाची कामे फक्त अतिक्रमण विभागासाठी वापरल्यास सोयीचे होईल. तरी बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेकामी असणारे निविदामधील निविदा क्र.३६२-६ वर्ष २०१६-१७ मे.समिर एंटरप्रायजेस (अ प्रभाग) व ३६२-४ वर्ष २०१६-२०१७ मे.समीर एंटरप्रायजेस(इ प्रभाग) या दोन निविदा अतिक्रमण कारवाईसाठी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ३०                                                   विषय क्रमांक – ०६

दिनांक – ०३/०८/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे                                                    अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.उषा ढोरे, मा.निकिता कदम यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.१८ मधील मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे या कामास सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात र.रु.१०,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. तथापी कामाची व्याप्ती वाढल्यामुळे सदर कामास सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी या कामास र.रु.३०,००,०००/-(वाढीव प्रशासकीय मान्यता र.रु.२०,००,०००/-) इतकी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५०२/२०१८
दिनांक : ०६/०८/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.